# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी राज्यात ठिकठिकाणी स्थापन केलेल्या बारवांचे संवर्धन करण्याबाबत

**(१) ३७ (२२-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिकठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी स्थापन केलेल्या, विशेषत: समनापुर (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील बारवाची दुरवस्था झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बारवांना प्राचीन स्मारकांचा दर्जा देऊन डागडुजी करण्यास निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बारवांचे जतन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२५-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

मौजे समनापूर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर येथील उक्त बारव हे असंरक्षित स्मारक आहे. सदर बारवेच्या जागेत व परिसरात अवैध बांधकाम केल्याचे नाशिक पुरातत्व विभाग कार्यालय यांच्या निदर्शनास आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर बारवाच्या क्षेत्रातील बांधकाम हटवण्यासाठी नाशिक पुरातत्व विभागीय कार्यालयाकडून श्री.रोकडे यांना दिनांक ११/०५/२०२२ रोजी नोटिस देण्यात आली आहे. तसेच, स्थानिकांच्या विनंतीनुसार मौजे समनापुर या बारवाच्या क्षेत्रातील पाहणी नाशिक पुरातत्व विभागीय कार्यालय यांच्याकडून करण्यात येऊन स्थानिक प्रशासनास सदर बारवेवरील अतिक्रमण काढण्याकरीता दिनांक ३०/०६/२०२२ रोजीपत्रव्यव्हार करण्यात आला आहे. तसेच, समनापूर बारव खाजगी जागेत असून श्री.राजू रोकडे यांनी सदर जागेवर त्यांच्या मालकीचा दावा केला आहे. सदर प्रकरण दिवाणी न्यायालयात दावा क्र. ६१२/२०२२ नुसार न्यायप्रविष्ट असल्यामुळे दुरूस्ती करण्याबाबत कार्यवाही करणे योग्य होणार नाही.

बारव पुर्नरूज्जीवन, जतन-संवर्धनासाठी तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली बारवं संवर्धन समिती गठीत करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यात रस्ते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करणेबाबत

**(२) ८९४ (२३-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातामध्ये मागील तीन वर्षांत सन २०२२ ते २०२४ दरम्यान एकूण ९५ हजार १५० रस्ते अपघात झाले असून त्यामध्ये ४१ हजार ६१२ लोकांचा मृत्यू झाला आहे, वाहनांची संख्या ३ कोटी २९ लाख इतकी झाली असून त्यामध्ये दुचाकी वाहनांची संख्या अधिक आहे, अपघातांची आणि त्यातून होणारी मनुष्यहानी गंभीर असून अनेक ठिकाणी वाहतुकीच्या बेदरकारपणामुळे नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून यामध्ये मृत्यूचे प्रमाण ४३.७३ टक्के असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई नाशिक महामार्गावर खड्ड्यांमुळे अपघातात वाढ झाली असून सन २०२४ मध्ये ३७ रस्ते अपघातांमध्ये ३० जणांचा मृत्यू झाला आहे तर २७ लोक गंभीर जखमी झाले आहेत तसेच मुंबई नाशिक महामार्गाच्या दुरुस्तीचे काम सध्या एम एम आर डी ए च्या माध्यमातून सुरू असून यादरम्यान बॅरिकेट्स पथदिवे अशा आवश्यक उपाययोजना न केल्यामुळे अपघातांची संख्या वाढत आहे, हे ही ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ या बारा महिन्यांच्या कालावधीत ११६२ रस्ते अपघात झाले असून त्यामध्ये ४२३ जणांचा मृत्यू झाला असल्याचे तसेच सांगली जिल्ह्यात रस्ते मोठे झाले परंतु अपघाताची मालिका थांबत नसल्याने मागील वर्षात ४४९ जणांचा अपघाती मृत्यू झाल्याने दर १९ तासाला एकाचा अपघात होऊन बळी जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कोल्हापूर, सांगली नाशिक जिल्ह्यासह इतर राज्यातील महामार्गावर वाढत्या अपघातांची संख्या रोखण्यासाठी रस्ते सुरक्षा उपाययोजना महामार्गाची दुरुस्ती कामे त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२४ मध्ये मुंबई नाशिक महामार्गावर ६११ इतके रस्ते अपघात झालेले आहेत.

तसेच मुंबई नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी बॅरिकेट्स व दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहे. अपघात प्रवणक्षेत्रात अपघात न होणेकरीता स्पीड ब्रेकर्स, ब्लींकर, कॅट आईज व निर्देश बोर्ड लावण्यात आलेले आहेत.

(३) सन २०२४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ११२० मोटर अपघाताचे गुन्हे दाखल आहेत. सन २०२३ मध्ये मोटर अपघाताचे ११९५ गुन्हे दाखल आहेत. सन २०२४ मध्ये मोटर अपघाताचे गुन्ह्यामध्ये -७५ गुन्ह्यांनी घट झाली आहे.
(४) राज्यातील महामार्गावरील व दृतगती मार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात कमी करण्यासाठी महामार्ग पोलीस विभागाकडून व वाहतूक पोलीस विभागाकडून रस्ता सुरक्षा अभियान, ब्लॅक स्पॉट iRAD, हायवे मुत्यूंजय दूत,महामार्ग हेल्पलाईन, एक राज्य एक ई-चलान, ९६ इंटरसेप्टर वाहने, ITMS, बिगर शासकीय संस्था, अपघाताचे शास्त्रीय विश्लेषण, अपघात कमी करण्यास मदत करणारे साधने, अधिसूचना, पार्कींग अवर्स इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मंजूर करण्यात आलेली वसतिगृहे अद्याप सुरू न झाल्याबाबत

**(३) १८९० (२३-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतिगृह सुरू करण्याबाबत शासनाने माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान परिपत्रक जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने संपूर्ण राज्यभरात एकूण ७२ वसतिगृहे मंजूर करण्यात आली असून ठाणे जिल्ह्यासाठी १०० मुलांकरीता व १०० मुलींकरीता प्रत्येकी १ अशी मंजूर करण्यात आलेली २ वसतिगृहे अद्याप सुरू न झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू वसतिगृहे घणसोली व कल्याण येथील भाड्याच्या जागेत सुरू करण्याची बाब प्रस्तावित असून सदरहू वसतिगृहे ठाणे येथेच सुरू करण्याची मागणी एका शिष्टमंडळाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मंजूर वसतिगृहे अद्याप सुरू न झाल्याने पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहत असून काही विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागत असल्याने सदरहू वसतिगृहे तातडीने ठाणे येथे सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०१-१२-२०२५) :** (१) होय.
(२), (३) व (४) होय, संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी ओ.बी.सी.शिष्टमंडळासमवेत बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ठाणे शहरामध्ये ओ.बी.सी. शिष्टमंडळाने सुचविलेल्या जागेस सहाय्यक संचालक यांनी प्रत्यक्ष भेट दिली. मात्र, सदर इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने तेथे वसतिगृह सुरु होऊ शकले नाही. तसेच, संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी वृत्तपत्रात बातमी देऊनही ठाणे शहर परिसरात १०० विद्यार्थी क्षमतेची इमारत/जागा भाडे तत्वावर उपलब्ध होत नसल्याने, श्री.संजय इंगळे (HUF) यांच्या मालकीची कृषी

उत्पन्न बाजार समिती येथील इमारत क्र.ए-१०, कल्याण, जि.ठाणे ही इमारत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलांचे शासकीय वसतिगृह, ठाणे या वसतिगृहाकरीता भाड्याने घेण्यास शासन ज्ञापन क्र. वगृयो-२०२५/प्र.क्र.०४/योजना-१, दिनांक २६/०३/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये वर्तमानपत्रामध्ये वेळोवेळी जाहीरात देवून गरजू व पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने वसतिगृह प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहेत. त्यानुषंगाने, १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे वसतिगृह सुरु करण्याची कार्यवाही चालू आहे.

तसेच, ठाणे जिल्ह्यामध्ये मुलींच्या वसतिगृहासाठी भाडेतत्वावर आवश्यक इमारत उपलब्ध होईपर्यंत सदर वसतिगृह MMRDA क्षेत्रातील इतर भागामध्ये (उदा.कल्याण) स्थलांतरीत करुन कार्यन्वित करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैद्यकीय साहित्याच्या जादा किंमत आकारून रुग्णांच्या कुटुंबियांची फसवणूक करणाऱ्या औषधी दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत

**(४) २१७७ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतेक रुग्णालयांशी संलग्न असलेल्या वैद्यकीय औषधांची विक्री करणाऱ्या दुकांनांकडून (मेडिकल स्टोअर्स) रुग्णालयात दाखल रुग्णांवरील उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय साहित्याची व औषधांची विक्री करताना रुग्णांच्या कुटुंबियांची फसवणूक करीत असल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश औषधे व वैद्यकीय साहित्याच्या विक्री रुग्णालयातील ग्राहकांना कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) ऐवजी मूळ खरेदी किमतीच्या ५ ते १० पट अधिक दराने वैद्यकीय औषध दुकानदार विक्री करीत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व रुग्णांच्या कुटुंबियांची फसवणूक करणाऱ्या वैद्यकीय औषध दुकानदारांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (१९-११-२०२५) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) हे खरे नाही.

अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय सुरु करण्याबाबत.

**(५) २३३८ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ साली केंद्रीय सुविधा भवन येथे ‘पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यालय या इमारतीत सुरू करण्यात आले होते परंतु सदर ४० वर्ष जुनी इमारत धोकादायक स्थितीत असल्यामुळे सदर कार्यालय खारघर येथील सेक्टर ३६ येथे १२ महिन्यांसाठी ४६ लाख ६४ हजार ४४३ रुपयांच्या भाडे करारावर घेतले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाडे करारावर घेतलेले कार्यालय हे वसाहतीच्या आतील बाजूस असल्याने लोकांना परिवहन कार्यालयात जाण्यास गैरसोयीचे होत असल्याने परिवहन विभागाचे स्वमालकीचे कार्यालय लवकरात लवकर सुरू करावे अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे स्वतःच्या मालकीचे कार्यालय सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (११-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) केंद्रीय सुविधा भवन ही इमारत जुनी व धोकादायक स्थितीत असल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल हे कार्यालय इतर ठिकाणी स्थलांतरीत करणे गरजेचे होते. सदर कार्यालयासाठी सिडको कार्यालयाने सिडकोच्या मालकीची व्हॅली शिल्प, को-ऑप हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.-एच-१, सेक्टर-३६, खारघर नोड, ता.पनवेल, जि.रायगड या इमारतीतील १११२.७६ चौ.मी. चटई क्षेत्र जागा उपलब्ध केली आहे. यासाठी ११ महिन्यासाठी रुपये ४६,६४,७३४.३५/- (डॉक्यूमेंटेशन चार्जेस व जी.एस.टी. सह) इतके भाडे निश्चित केले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाच्या स्वत:च्या मालकीचे कार्यालय सुरु करणेकरीता सिडकोकडून तळोजा नोड येथील भुखंड क्र.१, सेक्टर ३०, ही ११८९९.९७ चौ.मी. इतक्या क्षेत्राची जागा उपलब्ध करुन देणेकरीता लीज प्रिमियमचा १०० % रकमेचा भरणा केला आहे. सदर जागा विकसित व मोजणी करुन देण्याबाबत सिडकोकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(६) २५०८ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक २३१०७ ला दिनांक ३ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर २०२२ अन्वये प्रत्येक ११ महिन्याच्या कालावधीनंतर एक दिवसाचा दिलेला तांत्रिक खंड वगळण्यात येऊन शुद्धिपत्रक काढून त्यात वित्त विभाग महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १०/०९/२००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार व ई एस बी सी व एस इ बी सी (मराठा) कर्मचाऱ्यांसाठी निर्गमित शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. बीसीसी ११२२/प्र. क्र. १२८/१६ व दिनांक २१ सप्टेंबर २०२२ नुसार जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती १०:२०:३० ची आश्वासित प्रगती योजना अनुकंपा धोरण, वेतन वाढीसह (स्थगित केलेल्या) सेवानिवृत्ती पर्यंतची सर्व सेवा लाभ व निवृत्तीची लाभासाठी अर्हताकारी सेवा ग्राह्य धरावी अशा प्रकारे इतर काही मागण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना दिनांक

१४/०९/२०२४ रोजी व त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर व इतर निवेदनावर कोणती तातडीची कार्यवाही केली व करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०२५) :** (१) होय, खरे आहे.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०२४ अन्वये अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा प्रत्येक ११ महिन्यानंतर १ दिवसाचा तांत्रिक खंड सेवाविषयक (पदोन्नती, अनुकंपा धोरण व सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वगळून)
सेवानिवृत्तीविषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सागरी जिल्ह्यातील १३८ सहकारी संस्थांच्या मासेमारी नौकाकरीता डिझेल कोटा मंजूर करण्यात आल्याबाबत

**(७) २९६१ (१०-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०२५–२६ या कालावधीत सागरी जिल्ह्यातील १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या ५९,७९६ यांत्रिक मासेमारी नौकांकरीता मार्च महिन्याकरीता एकूण १,६८,१०९ किलोमीटर इतका डिझेल कोटा मंजूर करण्यात आला असल्याची माहिती मत्स्य विभागाकडून प्राप्त झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास,निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छीमार नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्याविषयी स्थापत्य केलेल्या समितीने सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या रियर क्राफ्ट ऑनलाईन प्रणालीनुसार नकार नोंदणी प्रमाणपत्र घेतलेल्या तसेच विधिग्राह्य मासेमारी परवाना असलेल्या अधिकृत मासेमारी नौकांनाच डिझेल कोटा अनुज्ञेय करण्यात आला आहे तसेच गस्ती नौका व ड्रोन सर्वेक्षणामध्ये मासेमारी करताना आढळून आलेल्या २२ जणांच्या मासेमारी परवाने रद्द करण्यात आले असून अशा व्यक्तींना डिझेल कोटा देण्याच्या प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेले नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील १२ सागरी मैलांच्या अंतर्गत जलक्षेत्रात पर्ससीन व एलईडी प्रकाशाद्वारे होणाऱ्या विनाशक मासेमारीवर बंदी असताना, शासनाच्या अनुदानित डिझेलचा वापर करून भांडवलदारांच्या बोटी बंदी क्षेत्रात व त्याच्या पलीकडील समुद्र हद्दीत विनापरवाना मासेमारी करीत असल्याची बाब कोळी युवाशक्तीने माननीय मत्स्य व्यवसाय विकास मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली आहे,, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मीरा-भाईंदरमधील शेकडो मच्छीमारांचा सुमारे २० ते २५ कोटी रुपयांचा डिझेल परतावा मागील वर्षापासूनप्रलंबित ठेवल्याने संबंधित मच्छीमारांना आर्थिक अडचणींना व कर्ज थकबाकीला सामोरे जावे लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मीरा-भाईंदरमधील शेकडो मच्छीमारांना डीझेल परतावा देण्याकरीता शासनने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.नितेश राणे (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही. सन २०२५-२६ या कालावधीत सागरी जिल्ह्यातील १३८ गच्छीमार सहकारी संस्थांच्या ७७९६ यांत्रिक मासेमारी नौकांकरीता एकूण १,६८,१०९.७७६ किलो लिटर इतका डिझेल कोटा माहे मार्च महिन्यात आयुक्त मत्स्यव्यवसाय, कार्यालयाचे जा.क्र. मत्स्य सा/०५२५०२/४४/ २०२५-२६, दिनांक ३१/०३/२०२५ अन्वये सन २०२५- २६ करीता (दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीकरीता) मंजूर करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे. महाराष्ट्र राज्यात अवैध मासेमारी सामुग्री व उपसाधनांचा वापर करून अवैध मासेमारी होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. मासेमारी नौकांवरील मासेमारी सामुग्री व उपसामुग्री तपासून ते मासेमारी परवान्यानुसार योग्य असल्याची खात्री करून विधीग्राह्य मासेमारी परवाना असलेल्या अधिकृत मासेमारी नौकांच डिझेल कोटा अनुज्ञेय करण्यात येतो. म.सा.मा.नि.अ. १९८१ (सु-२०२१) अंतर्गत कार्यवाही करून मासेमारी परवाना रद्द केलेल्या नौकांना डिझेल कोटा प्रस्तावित करण्यात येत नाही.
(३) कोळी युवाशक्ती संघटना यांनी पर्ससीन व एलईडी प्रकाशाद्वारे होणाऱ्या मासेमारीबाबत निवेदन दिले आहे.
(४) हे, खरे नाही. उत्तर मिरा-भाईंदर परिक्षेत्रातील उत्तन येथील ५ मच्छीमार सहकारी संस्थांच्या मच्छीमार सभासदांना एकूण रुपये ९२८.३५ लक्ष इतका परतावा सन २०२४-२५ मध्ये वितरीत करण्यात आला आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये याच संस्थांच्या मच्छीमार लाभार्थ्यांना रुपये ३२८.४२ लक्ष इतका डिझेल परतावा वितरीत करण्यात आला आहे.
(५) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात डिझेल परतावाकरीता रुपये १४७.७८ कोटी इतकी रक्कम अर्थ संकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी माहे जून २०२५ या महिन्यात रुपये २८.४८ कोटी इतका डिझेल परतावा मच्छिमारांना वितरीत करण्यात आला आहे.

---

## वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे सब स्टेशन मंजुर करण्याबाबत

**(८) ३०४९ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) परिसरातील कुऱ्हा, वढोदा, भोटा, निमखेडी बागायती क्षेत्रामुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढल्याने परिसरात कायमस्वरूपी सुरळीतपणे विजेचा पुरवठा होण्यासाठी वढोदा (ता.मुक्ताईनगर) येथे १३२/३३ KVA सब स्टेशन होणे संदर्भात वि.प.स. यांनी दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी व्यवस्थापकीय संचालक मुंबई यांचेकडे पत्र व्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, वढोदा (ता.मुक्ताईनगर) येथे १३२/३३ KVA सब स्टेशन मंजूर करणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

वढोदा (ता.मुक्ताईनगर) येथे १३२/३३ KVA क्षमतेचे नवीन सब स्टेशन सुरु करण्याच्या मागणीबाबतचे मा.विधानपरिषद सदस्य श्री.एकनाथराव खडसे यांचे दिनांक ०९/१२/२०२४ रोजीचे पत्र संचालक, महानिर्मिती कंपनी यांना प्राप्त झालेले आहे.
(२) १३२/३३ के.व्ही. मुक्ताईनगर उपकेंद्राची स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए. (१३२/३३ के.व्ही., २x५० एम.व्ही.ए.) इतकी आहे. १३२/३३ के.व्ही. मुक्ताईनगर उपकेंद्रावर ५६ एम.व्ही.ए. महत्तम वीज भाराची नोंद झाली असून या उपकेंद्रातील रोहित्रांवर ४४ एम.व्ही.ए. वीज भार घेण्याची क्षमता शिल्लक आहे.

महावितरण कंपनीकडून वढोदा ता.मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे नवीन १३२/३३ के.व्ही. वीज उपकेंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमास दिनांक ३०/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे. राज्य पारेषण उपक्रमाकडून सदर मागणीबाबत तांत्रिक व प्रणाली अभ्यासाद्वारे सुसाध्यता तपासून नियमानुसार योग्य तो निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आल्याबाबत

**(९) ३०६४ (१७-०७-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासासाठी एकूण रुपये ४ लाख ७ हजार कोटी एवढ्या रक्कमेचे सामंजस्य करार वांद्रे-कुर्ला संकुलातील जीओ वल्ड सेंटर येथील इंडिया ग्लोबल फोरम, २०२५ या कार्यक्रमामध्ये करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर करारात कोणकोणत्या अटी आहेत, तसेच कोणकोणत्या प्रकल्पांची कामे करण्यात येणार आहेत,
(३) सदर करारांमुळे कोणकोणत्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.

इंडिया ग्लोबल फोरम २०२५ या कार्यक्रमामध्ये मुंबई महानगरविकास प्राधिकरणाने खालील संस्थाबरोबर सांमजस्य करार केले आहेत.

१. हाउसिंग ॲण्ड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (HUDCO) रुपये १.५० लाख कोटी.

२. आर. ई. सी. लिमिटेड (REC Ltd.) रुपये १लाख कोटी.

३. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (PFC Ltd.) रुपये १ लाख कोटी.

४. इंडियन रेल्वे फायनान्स कॉर्पोरेशन (IRFC) रुपये ५०हजार कोटी.

५. नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड डेव्हलपमेंट (NaBFID) रुपये ७ हजार कोटी.

(२) सदर करारात खालील अटी आहेत,
१. मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वित्त पुरवठा करणे.
२. अंतिम कर्ज मंजूरी संबंधित प्रकल्पाच्या व्यवहार्यता व सखोल मुल्यमापन करण्याच्या अधिन राहुन प्रकल्प निहाय कर्ज मंजूरी (Line of Credit) करण्यात येणार आहे.

३. निविदा मागवून कर्ज कमीतकमी व्याजदाराचे घेण्यात येणार आहे. तसेच करारानुसार ठराविक मर्यादेपर्यंत कर्ज घेण्यास मंजूरी आहे.
४. सदर करार हे सामजस्य करार असून, कायद्यानुसार बंधनकारक नाहीत.
या करारांमुळे उपलब्ध होणाऱ्या निधी मधुन मेट्रो, रस्ते, पूल, नागरी सुविधा, तिसरी मुंबई, इत्यादी पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे करण्यात येणार आहेत.
(३) सदर करारमुळे उपलब्ध निधीमुळे मुंबई महानगर क्षेत्राला जागतिक आर्थिक केंद्र बनविण्यास मदत होणार आहे तसेच, वाहतूक कनेक्टीव्हिटी व नागरी सुविधा यामध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे. त्यामुळे मुंबई महानगर क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा प्रकल्प निगडित मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत.

---

## राज्यातील धर्मादाय रुग्णालयांवर ऑनलाईन नियंत्रण ठेवण्याबाबत

**(१०) ३१४२ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मादाय रुग्णालयांवर ऑनलाईन नियंत्रण ठेऊन विशेष पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दि २३/४/२०२५ रोजी वा त्या सुमारास संबंधिताना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सूचनांचे स्वरुप काय आहे, सदर सूचनांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-१२-२०२५) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०४/२०२५ रोजी आयोजित बैठकीत विशेष पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने विधि व न्याय विभागाच्या दिनांक १०/०६/२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रणासाठी धर्मादाय आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयातून विशेष पथक स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच दिनांक १०/०६/२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. धर्मादाय संघटनेतील सर्व कार्यालयांना त्यांच्या अखत्यारीतील धर्मादाय रुग्णालयांना धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, रुग्णालयात कार्यरत शासकीय योजना व इतर माहिती ऑनलाईन प्रणालीवर व डॅशबोर्डवर दर्शविण्याचे निर्देश धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत. तसेच रुग्णालयांकडून निर्धन व दुर्बल घटकातील किती रुग्णांना उपचार देण्यात आले याबाबत प्राप्त होणारे मासिक अहवाल रुग्णालयांनी Public Domain वर उपलब्ध करुन देण्याबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून निर्देश देण्यात आले आहेत.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये या योजनेंतर्गत धर्मादाय रुग्णालयांनी प्रथम संबंधित रुग्ण तातडीने भरती करुन घेऊन त्यावर उपचार करावेत व त्याबाबत ऑनलाईन प्रणालीवर नोंद घेऊन पुढील ४८ तासात

प्रस्ताव धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात ऑनलाईन प्रणालीमध्ये कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व धर्मादाय रुग्णालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच धर्मादाय रुग्णालयातील डॉक्टरांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांची तपासणी व उपचार करण्यास टाळाटाळ करु नये याबाबत सूचना देण्याचे निर्देश महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला देण्यात आले होते. त्यानुषंगाने धर्मादाय रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना व संबंधितांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मानसिकदृष्टया अपंग किंवा गतिमंद मुलींसाठीची विशेषगृहे कार्यान्वित करण्याबाबत

**(११) ३२५८ (१०-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानसिकदृष्ट्या अपंग अथवा गतिमंद मुलींसाठी विशेषगृहे स्थापन व कार्यान्वित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतिमंद मुलीसाठी राज्यात विशेषगृहे कार्यान्वित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०१-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यामध्ये अनाथ मतिमंद बालगृह ही योजना दिव्यांग कल्याण या विभागामार्फत राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी १२ अनुदानित अनाथ मतिमंद मुला-मुलींसाठी बालगृह चालविण्यात येत आहेत. त्यापैकी एकूण ५ बालगृहांमध्ये मुलींना प्रवेश देण्यात येतो.

तसेच, दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत १८ वर्षावरील मानसिक आजारमुक्त व्यक्तींकरीता ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी येथे १६ पुनर्वसन गृहे स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर पुनर्वसन गृहांमध्ये ५० टक्के १८ वर्षावरील मुलींना प्रवेश देण्यात येतो. त्यानुसार दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०२४ अन्वये नागपूर, पुणे व ठाणे येथे ३ तर दिव्यांग कल्याण विभाग, शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ अन्वये ठाणे, नागपूर व पुणे येथे ०५ अशा एकूण ०८ पुनर्वसन गृहांची स्थापना करण्यात आलेली आहे.

उर्वरीत ८ पुनर्वसन गृहांबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाच्या बंद पडलेल्या दुध डेअरी खाजगी भागीदारीतून सुरु करण्याबाबत

**(१२) ३३५६ (१८-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय दुध डेअरी खाजगी भागीदारीतून चालविणे बाबत सन २०१४-२०१९ दरम्यान शासनाने निर्णय घेतला असून, 'आरे' हा शासनाचा ब्रान्ड जीवित राहावा या हेतूने राज्यातील दुध डेअरी आहे त्या स्थितीत दुध संघ अथवा खाजगी कंपनीस देणे बाबत शासनाने शासन निर्णय देखील निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने अनेक संस्थांनी शासनाकडे प्रस्ताव देखील सादर केले होते परंतु अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करून शासनाच्या दुध डेअरी या पूर्ववत चालू करणे तसेच आरे हे नाव पुनः बाजारात आणण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०३-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासनाने केलल्या उपाययोजना खालीलप्रमाणे: दुग्धव्यवसाय विभागातील विविध शासकीय दुग्धशाळा, शासकीय दूध शितकरण केंद्रे व दुग्ध प्रकल्प इत्यादी ठिकाणी प्रक्रिया करण्यासाठी बसविण्यात आलेली विविध संयंत्रे यांना साधारणतः ३० वर्षापेक्षा जास्त काळ लोटला असल्याने तसेच दुग्धव्यवसायात खाजगी व सहकारी क्षेत्राचा वाढता सहभाग विचारात घेऊन शासनाने दुग्धव्यवसायातून टप्याटप्प्याने बाहेर पडण्याचा कृषी व पदुम विभागाच्या दिनांक ११/११/२००२ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन आरे स्टॉलमध्ये पूर्वी शासनाचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विकणे बंधनकारक होते. परंतु शासनाचे दूध उत्पादन कमी होत गेल्याने स्टॉल धारकांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने शासन पत्र दिनांक २९/०७/२०२२ व दिनांक २९/०३/२०२३ अन्वये आरे केंद्रावर इतर सहकारी व व्यवसायिक संस्थांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री करण्याची परवानगी देण्यात आली.
राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (NDDB) मार्फत महाराष्ट्र राज्य दुध उत्पादक महासंघ मर्या. (महानंद) च्या पुनरुज्जीवनाचा भाग म्हणून बृहन्मुंबई दुध योजनेचे १८११ स्टॉल रुपये १/- नाममात्र दराने प्रतिवर्ष/प्रतिस्टॉल भाडेतत्वावर ३० वर्षांच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य दूध उत्पादक महासंघ मर्या. (महानंद) यांना हस्तांतरीत करण्यास शासन पत्र दिनांक ०७/०८/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. आरे स्टॉलवरुन "महानंद" या ब्रँडचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकणे बंधनकारक असणार आहे तसेच आरे स्टॉलवरुन "आरे" ब्रँडचे दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करणे बंधनकारक करण्याबाबत शासन विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा (जि.अकोला) येथील रुग्णालयात पशुवैद्यकीय अधिकारी नियमित सेवा देत नसल्याबाबत

**(१३) ३९२८ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) येथील दुसऱ्या क्रमांकाची मोठी ग्रामपंचायत असलेल्या दानापूर येथे शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालयात पशुवैद्यकीय अधिकारी (तज्ञ डॉक्टर) व परिचारक नियमित येत नसल्याचे माहे, मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय कारभार तसेच पशुंवर उपचार करण्यास अडचणी येत असल्याने सदर प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१२-२०२५) :** (१) व(२) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत तेल्हारा पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी एक पशुधन पर्यवेक्षक व एक परिचर अशा दोन पदे मंजूर आहेत.त्यापैकी परिचर हे पद दिनांक २८/०३/२०२५ पासून रिक्त आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षक या पदावर कार्यरत असलेले कर्मचारी दिनांक ०७/०५/२०२५ ते १७/०६/२०२५ या कालावधीमध्ये वैद्यकीय कारणास्त्व रजेवर होते. सदर कालावधीमध्ये पशुधन पर्यवेक्षक, पशुवैद्यकीय दवाखाना पंचगव्हाण यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देऊन तेल्हारा पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात पशुआरोग्य सेवा पुरविण्यात येत होत्या.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## रायगड किल्ल्यावरील बाजारपेठ व जगदीश्वर मंदिर परिसरातील धनगर समाजाच्या लोकांना गड रिकामा करण्याची नोटीस दिल्याबाबत

**(१४) ४४५८ (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड किल्ल्यावरील बाजारपेठ व जगदीश्वर मंदिराच्या खालच्या परिसरात राहत असलेले लोक गडावर येणाऱ्या पर्यटकांसाठी दूध, दही, ताक, चहा, नाश्ता आणि जेवण विकून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या धनगर समाजाच्या लोकांना गड रिकामा करण्याची नोटीस पुरातत्व विभागाकडून पाठवविण्यात आली असल्याची बाब, माहे जून, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ७ पिढ्यापासून वास्तव करित असलेल्या तसेच उदरनिर्वाह करणाऱ्या धनगर समाजाच्या स्थानिक रहिवाशांना गड खाली करायला सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रायगड किल्ल्यावरील धनगर समाजाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२५-११-२०२५) :** (१) व (२) होय.
रायगड किल्ला या केंद्र संरक्षित स्मारकाच्या संरक्षित, प्रतिबंधित व नियंत्रित क्षेत्रात असलेल्या अतिक्रमण निष्कासनांसाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांच्याकडून पत्र क्र. ए. एस. आय/आर. एस. सी/नोटिस/२०२५-२६-४९, दिनांक १३/०५/२०२५ अन्वये नोटिस दिलेली आहे.
(३) व (४) रायगड किल्ल्याच्या संरक्षित क्षेत्रात सदर अवैध बांधकामे असून सदर जमीन सरकारी मालकीची असल्याने सदर प्रश्न उदभवत नाही.

---

## चंदनापुरी घाटातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) ४४८६ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदनापुरी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) गावाजवळ असलेल्या चंदनापुरी घाटात अपघातांचे प्रमाण वाढल्यामुळे वाहनधारक व प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदनापुरी घाट राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाने हस्तांतरित करून घेणे क्रमप्राप्त असताना अद्याप सदर घाट हस्तांतरित करून घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील काँक्रिटीकरणाचे अपूर्ण कामामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असल्यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार निवेदने देण्यात आली आहेत तसेच सदर अपघाताच्या कारणांची चौकशी करुन अपघातांचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

पुणे- नाशिक हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० असून, सदर रस्ता हा देखभाल दुरुस्तीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे आहे. माहे मार्च, २०२५ वा त्यासुमारास झालेले अपघात हे Traffic Diversion च्या ठिकाणी वाहनाचे Over Speeding, Over Taking व वाहन चालकांनी वाहतूकीचे नियम न पाळल्यामुळे झालेले आहेत.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे खेड सिन्नर सेक्शनमध्ये रस्ता मजबुतीकरण व काँक्रिटचे काम चालू असल्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक वळविणे (Traffic Diversion) आवश्यक आहे, तथापि, सदर महामार्गावर चंदनापुरी घाटादरम्यान काँक्रिटीकरणाचे काम सुरु असताना कार्यालयातील नियुक्त ठेकेदाराने सुरक्षेच्या दृष्टिने सर्व उपाय योजना अमलात आणून सदर ठिकाणी चंदनापुरी घाटाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(२) चंदनापुरी जुना घाट रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरणाची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३) हे खरे नाही.

Traffic Diversion च्या ठिकाणी वाहनाचे ओव्हरस्पीडींग, चुकीचे ओव्हरटेकींग व वाहन चालकांनी किंवा वाहन धारकांनी वाहतूकीचे नियम न पाळल्यामुळे सदर अपघात झालेले आहेत.

(४) संबंधित ठिकाणी वाहतूक वळविण्यापूर्वी सर्व प्रकारच्या आवश्यक त्या सुरक्षा योजना पुरविण्यात येत असून या महामार्गावर काँक्रिटीकरणाचे काम सुरू करण्याआधी संबंधित ठेकेदाराने वाहनचालकाच्या सुरक्षेबाबत सर्व उपाययोजना अंमलात आणण्यासाठी Traffic Diversion चे प्लान तयार करुन तसेच संबंधित पोलीस विभागाशी समन्वय साधून संबंधित ठिकाणी ट्राफिक वळविणेबाबतचे दिशादर्शक फलक लावून व सर्व सुरक्षा वाहतूक उपाययोजना करुन काम करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास मान्यता मिळाल्याबाबत

**(१६) ४६३८ (१२-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री तीर्थक्षेत्र तुळजापूर विकास आराखड्यास शासनाने तत्वतः मान्यता दिली असून गत दोन वर्षात तुळजापूरचा विकास होईल अशी ग्वाही मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर विकास आराखड्यात तुळजाभवानी मंदिर परिसरातील विकास कामांचे नियोजन तसेच तुळजापूर हे हेरिटेज टूर विकसित करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विकासासाठी ७३ एकर भूसंपादनाची आवश्यकता असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०८-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्याकरीता ७३ एकर भूसंपादनाची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने नियोजन विभागाच्या दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूसंपादन /पुनर्वसन या कामासाठी रुपये ३३८.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी धाराशिव यांच्यामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या मागणीच्या अनुषंगाने दिनांक २०/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १८.८९ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) लागू नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(१७) ८७१५ (१५-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जवळपास ६ हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे रुपये १५० कोटीचे देणे मागील दोन वर्षापासून थकीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर निवृत्त कर्मचाऱ्यांपैकी ३८ निवृत्त कामगारांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकित देणे देण्याबाबत निवृत्त कर्मचाऱ्यांनी परिवहन महामंडळाकडे निवेदनाद्वारे मागणी केली असून याची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महिना तीन हजार रुपये इतके अत्यल्प निवृत्तीवेतन मिळत असल्याने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत देणे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) व (२) माहे मे,२०२१ पावेतो सेवानिवृत्त झालेल्या सर्व पात्र कर्मचारी (मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांसह) यांना त्यांचे सेवानिवृत्तीचे लाभ जसे की, भविष्य निर्वाह निधी, उपदान, रजा रोखीकरण, करार थकबाकी देण्यात आलेली आहे.
(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाचे निवृत्त वेतन नियम लागू नसल्याने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निवृत्ती वेतन अदा करण्याची बाब उद्‌भवत नाही.

---

## इतर मागास व बहुजन कल्याण विभाग अंतर्गत आश्रम शाळेतील २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एनपीएस खात्याबाबत

**(१८) २१०५७ (०४-०१-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागास व बहुजन कल्याण विभाग अंतर्गत आश्रम शाळेतील २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस खाते एनपीएस मध्ये वर्ग करण्यात आले नसल्याचे तसेच इतर मागास व बहुजन कल्याण विभागाअंतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांना डी.सी.पी.एस पावत्या व हिशेब मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती आश्रम शाळेतील २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस खाते एनपीएस मध्ये वर्ग करणेबाबत व बहुजन कल्याण विभाग अंतर्गत प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांचे डी.सी.पी.एस पावत्या व हिशेब देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१९-११-२०२५) :** (१) होय, खरे आहे.
(२) राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळेत सन २००५ नंतर नियुक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस खाते एनपीएस प्रणालीत वर्ग करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या वित्त विभाग, संचालक, लेखा व कोषागारे यांच्या सूचनेनुसार सूधारणेसह फेरप्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. मान्यतेनंतर आवश्यक तरतुदींसह आश्रमशाळेतील सर्व DCPS धारक कर्मचाऱ्यांच्या सदर प्रणालीतील राज्यशासनाचा हिस्स्याची रक्कम संबंधितांच्या खात्यात वर्ग करून एनपीएस प्रणाली लागू करण्याचे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे कोरेगाव (ता.कोरेगांव,जि.सातारा) येथील पोलीस वसाहत व पोलीस कार्यालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) २११६२ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरेगांव (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे पोलीस ठाणे व प्रशासकीस इमारत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकरीता ३९ आर व पोलीस अधिकारी वसाहतीकरीता २१ आर अशी एकूण ६० आर जागा निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून अद्यापही शासनाने या प्रस्तावाला मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पोलीस वसाहतीसाठी तसेच कार्यालयासाठी मंजुरी देऊन यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२५) :** (१) होय.

(२) व (३) पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत गृह विभाग, शासन पत्र दिनांक ०७/०२/२०२३ अन्वये उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा ग्रामीण कॅम्प कोरेगांव कार्यालय व कोरेगांव पोलीस ठाणेकरीता प्रशासकीय इमारत तसेच पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता ५५ शासकीय निवासस्थान बांधकाम या कामाचा समावेश करण्यात आला आहे. प्राधान्यक्रमानुसार प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रगती प्रतिष्ठान संचलित निलेश ल. मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय, जव्हार, जि.पालघर व इतर शाळांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२०) २३८२९ (१६-०७-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रगती प्रतिष्ठान संचलित निलेश ल. मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय, (ता.जव्हार, जि.पालघर) यांनी थकीत वेतनेतर अनुदान, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सातवा वेतन आयोग फरक थकबाकी व विद्यालयातील रिक्त पदे भरतीसाठी नाहरकत दाखल मिळण्याबाबत शासनाकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार विद्यालयाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रगती प्रतिष्ठान संचलित निलेश ल. मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय, ता.जव्हार, जि पालघर या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या सातवा वेतना आयोगाच्या फरकाची रक्कम रुपये ८७,२६,६१९/- दिनांक २०/०७/२०२४ च्या पत्रान्वये वितरीत केलेली आहे.
तसेच सन २०२१-२२ चे थकीत अनुदान व सन २०२२-२३ चे ६० टक्के अनुदान असे एकूण २६,०७,१३९/- इतकी रक्कम संस्थेस दिनांक ६/१२/२०२४ च्या आदेशान्वये अदा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे रुपये १,३४,५७९/- इतके अनुदान संस्थेस दिनांक २८/०३/२०२५ च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आले आहे.

संस्थेचा नाहरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून नाकारण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.